# जाहिरात

## झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
## पुणे व पिंपरी-चिंचवड क्षेत्र, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड, पुणे यांचे कार्यक्षेत्रामधील झोपडपट्टीपुनर्वसन योजना राबवण्यासाठी प्राधिकरणाकडील नोंदणीकृत विकसकामार्फत प्रस्ताव दाखल होतात. विकसक नोंदणी तसेच त्यामधील बदलासंदर्भात कंपनी अधिनियम व भागीदारी अधिनियमांतर्गत कायदे विषयक बाबींबाबत कायदेशीर सल्ला देणेसंदर्भात तसेच रजिस्ट्रार ऑफ कंपनी आणि सहाय्यक निबंधक, भागीदारी संस्था यांचेकडून आवश्यक त्या घटकासाठी नोंदणी प्रमाणपत्र घेणे याकरिता कंपनी सचिवांच्या सेवेची गरज असते. त्यामुळे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या पॅनेलवर कंपनी सेक्रेटरी/ PCS फर्म (Practicing Company Secretaries Firm) यांची करार पध्दतीने ३ वर्षाच्या कालावधीकरीता कंत्राटी सेवा उपलब्ध करावयाची आहे. त्याकरीता प्राधिकरणाच्या पॅनेलवर कार्यरत होण्यास इच्छुक व पात्र कंपनी सेक्रेटरी/ PCS फर्म यांचेकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांच्या www.srapune.in या संकेतस्थळावर दि.२१/७/२४ ते दि.३१/७/२०२४ या कालावधीमध्ये अर्ज मागविण्यात येत आहेत.

A. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे अंतर्गत कंपनी सेक्रेटरी सेवा उपलब्ध करून देणाऱ्या पॅनेलवर काम करण्याबाबतच्या सर्वसाधारण अटी व शर्ती खालीलप्रमाणे असतील :-

१. अर्जदारहा भारताचा नागरिक असावा/ PCS फर्म ही कंपनी कायद्यांतर्गत नोंदविलेली कंपनी/एल एल पी असावी.
२. उमेदवाराने/संस्थेने भारतीय कंपनी सचिव संस्था (ICSI)यांचेकडील कंपनी व्यावसायीक सचिव नोंदणीचे प्रमाणपत्र धारण केलेले असावे.
३. अर्ज सादर करावयाच्या अंतिम दिनांकास अर्जदारासकिमान १५वर्ष व्यावसायीक कंपनी सेक्रेटरी म्हणून काम केल्याचा अनुभव असावा.
४. अर्जदारास मराठी, हिंदी व इंग्रजी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.
५. अर्जदारास/PCS फर्मला प्रामुख्याने भारतीय कंपनी अधिनियम, १९५६, भारतीय भागीदारी अधिनियम १९३२, लिमिटेड लायबिलिटी पार्टनरशिप ॲक्ट २००८ चे तसेच इतर संबंधित कायद्यांचे सखोल ज्ञान असणे आवश्यक आहे.
६. PCS फर्मचे नोंदणीकृत कार्यालय पुणे महानगरपालिका किंवा पिंपरी-चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये असले पाहिजे.
७. अर्जदारास/PCS फर्मकडे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाशी संबंधित अधिनियम/नियम/ शासन निर्णय/परिपत्रके यांचे पुरेसे ज्ञान असणे आवश्यक आहे.
८. PCS फर्मचे गेल्या ३ आर्थिक वर्षांतील सरासरी वार्षिक व्यावसायिक ढोबळ उत्पन्न (GST वगळून) रु. २५ लाखांपेक्षा कमी नसावे.

९. PCS फर्मकडे व्यावसायिक कर, पॅन, TAN, जीएसटी क्रमांक, उद्योग/उद्योग आधार, (दुकान आणि आस्थापना कायदा) व इतर नोंदणी असणे आवश्यक आहे.

B. <u>अर्जासोबत सादर करावयाची कागदपत्रे :-</u>

१) विहित नमुन्यातील अर्ज,

२) शैक्षणिक अर्हते संदर्भात सर्व गुणपत्रके व प्रमाणपत्रे, कंपनी सेक्रेटरीचे व्यावसायाचे प्रमाणपत्र (सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित प्रती सादर कराव्यात) व भारतीय कंपनी सचिव संस्थान (ICSI) यांचेकडील नोंदणी प्रमाणपत्र सादर करावे.

३) अर्जदाराने त्यांचे अनुभवाबाबतचे स्व-साक्षांकनांचे घोषणापत्र सादर करावे. PCS फर्मला/ PCS फर्मच्या सर्व भागीदारांकडे ICSI द्वारे जारी केलेले व्यावसायाचे वैध प्रमाणपत्र दाखल करणे आवश्यक आहे.

C. <u>निवडीची सर्वसाधारण प्रक्रिया :-</u>

१) प्राप्त अर्जांची छाननी करून मुलाखतीसाठी पात्र/अपात्र उमेदवारांची यादी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणेच्या www.srapune.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

२) प्राप्त अर्जांची छाननी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता, कामाचा अनुभव व झोपुप्रा अधिनियमातील कामकाज व इतर तद्अनुषंगिक बाबींच्या आधारे करण्यात येईल. त्यास अनुसरुन त्यांचे गुणांकन केले जाईल व विशिष्ट गुणांकनाच्या वरील उमेदवारांनाच मुलाखतीसाठी निमंत्रित केले जाईल.

३) गुणांकन तपशील :-

- ६०% च्या वरील गुणांकन असणाऱ्या अर्जदारास मुलाखतीस बोलवण्यात येईल.
- सर्वात जास्त गुणांकन असणाऱ्या अर्जदाराची निवड त्याच्या गुणवत्तेनुसार होईल.

४) अर्जदारांची निवड ही मुलाखतीमधील गुणांच्या आधारे करण्यात येईल.

५) मुलाखतीस येताना मूळ कागदपत्रे आणणे आवश्यक आहे.

६) कंपनी सेक्रेटरी/PCS फर्म पॅनेल निवडीसाठी गठीत केलेल्या समितीमार्फत मुलाखतीद्वारे उमेदवारांची निवड केली जाईल. मुलाखतीचे गुणांकन करताना विचारात घ्यावयाच्या बाबी व कोणत्या बाबीस किती गुण द्यावेत हे ठरविण्याचा तसेच विहित पात्रतेचे निकष पूर्ण करणाऱ्या उमेदवारांमधून योग्य उमेदवार निवडीबाबतचे संपूर्ण अधिकार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या निवड समितीस राहतील.

७) कंपनी सेक्रेटरी/PCS फर्म पॅनेलवर निवडीची प्रक्रिया कोणत्याही स्तरावर स्थगित करणे/तहकूब करणे/रद्द करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे यांचेकडे राखीव राहतील.